पुर्णा नगरपरिषदेच्या ८० कोटींच्या पाणीपुरवठा योजनेत वीजचोरीचा धक्कादायक प्रकार!

कंत्राटदाराने वीजवाहिनीवर आकडा टाकून लाखोंची चोरी; महावितरणचे मौन, नागरिक संतापले

(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

पुर्णा– शहरातील नगरपरिषदेच्या जलपुरवठा योजनेसाठी सुरू असलेल्या पाण्याच्या टाकी बांधकामात वीजचोरीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराने थेट विद्युत वाहिनीवर आकडा टाकून वीज चोरली असल्याचे उघडकीस आले. या प्रकरणामुळे महावितरण कंपनीला लाखों रुपयांचे नुकसान झाले असून, आता कंत्राटदारावर कायदेशीर कारवाई होणार का, याकडे संपूर्ण शहराचे डोळे लागले आहेत.

नगरपरिषदेने शहरासाठी ८० कोटी रुपयांची भव्य पाणीपुरवठा योजना मंजूर केली आहे. या योजनेअंतर्गत शहरात चार ठिकाणी मोठ्या जलसाठवण टाक्या बांधल्या जात आहेत. मात्र, बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या यंत्रसामग्रीसाठी जसे व्हायब्रेटर, मिक्सर, ड्रिल मशीन इ. कंत्राटदाराने गेल्या दीड महिन्यांपासून वीजचोरी सुरू केली होती. महावितरणच्या कर्मचाऱ्यांना या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी जाऊन तपास करण्यात आला, तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसत नाही.

सामान्य माणसावर गुन्हा, कंत्राटदाराला सूट? नागरिकांमध्ये प्रचंड संतापाची लहर उसळली आहे. ''सामान्य नागरिकाने वीजचोरी केली तर तात्काळ गुन्हा दाखल होतो, पण नगरपरिषदेच्या कंत्राटदाराला का सूट मिळतेय?'' असा सवाल उपस्थित करत ते महावितरणच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. शहरात चर्चा आहे की, हा कंत्राटदार प्रभावी लोकप्रतिनिधीचा जवळचा असल्याने अधिकारी मौन बाळगत आहेत. कंत्राटदाराच्या सततच्या चुकांमुळे नगरपरिषदेची बदनामी होत असल्याचेही मत व्यक्त केले जात आहे.

कंत्राटदाराच्या निष्काळजीपणाचा पूर्व इतिहासही समोर आला आहे. काही महिन्यांपूर्वी हरिनगर भागात पाण्याच्या टाकीच्या खड्ड्यात पडून १० वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला होता. त्या वेळीही कोणतीही कारवाई झाली नव्हती. आता वीजचोरीचा प्रकार समोर आल्याने नागरिकांनी ''महावितरणने तात्काळ गुन्हा दाखल करा!'' अशी मागणी केली आहे.

या सततच्या चुकांमुळे ८० कोटींची पाणीपुरवठा योजना योग्यरित्या तडीस जाईल का, यावर शंका उपस्थित होत आहेत. नगरपरिषदेची या प्रकरणात काय भूमिका असणार, याकडेही लक्ष केंद्रित झाले आहे.

सदर प्रकरणाची सखोल चौकशी व तातडीने कारवाईची मागणी नागरिकांतून जोरदार होत आहे. महावितरण व नगरपरिषदेच्या भूमिकेवर शहराचे लक्ष्य लागले आहे.

शेतकऱ्यांना सन २०२४ चे अतिवृष्टी अनुदान मिळावे– वाडेकर

(बाळासाहेब ढेरे/ दै.धर्मयोध्दा)

घनसावंगी - तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले असून, शासनाने जाहीर केलेले अतिवृष्टी अनुदान अद्याप अनेक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेले नाही. या पार्श्वभूमीवर शिव उद्योग सहकार सेना प्रदेशाध्यक्ष रामेश्वर वाडेकर यांनी कृषी, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांना तातडीने थकबाकी अनुदान देण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, घनसावंगी तालुक्यातील अनेक गावांमध्ये २०२४ च्या पावसाळ्यात अतिवृष्टी झाली होती. या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कपाशी, तूर, मका, भाजीपाला यासह विविध पिकांचे मोठे नुकसान झाले. शासनाने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची घोषणा केली होती, मात्र प्रत्यक्षात हजारो शेतकरी अजूनही या मदतीपासून वंचित आहेत. काही भागांतील शेतकऱ्यांना अनुदान मिळाले असले, तरी बहुतांश गावांतील शेतकरी अद्याप प्रतीक्षेत आहेत.

शिवसेनेतर्फे सादर करण्यात आलेल्या या निवेदनाची दखल घेऊन शेतकऱ्यांच्या अडचणी तातडीने दूर कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या मागणीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये थोडी आशा निर्माण झाली असून, शासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

आर.पी. हॉस्पिटलमध्ये गर्भवती महिलेला मिळाले जीवनदान मृत बाळामुळे महिलेचा जिव आला होता धोक्यात

परभणी – शहरातील एका ३८ वर्षीय गर्भवती महिलेची गंभीर वैद्यकीय परिस्थितीत आमदार डॉ.राहुल पाटील यांच्या आर.पी हॉस्पिटलच्या तत्पर वैद्यकीय सेवेमुळे तिला जीवनदान मिळाले आहे. या महिलेच्या गर्भातील बाळ मृत झाल्याने तिला अतिरिक्त रक्तस्राव आणि वाढलेला रक्तदाब यांसारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागले.यावर मात करत आर.पी हॉस्पिटलने महिलेचा जिव वाचवला. गरोदरपणाचे नऊ महिने पूर्ण झाल्याने तिची परिस्थिती आणखीनच नाजूक बनली होती. परभणी शहरातील विविध दवाखान्यांमध्ये उपचारासाठी गेल्यावरही तिला कोणत्याही हॉस्पिटलने दाखल करून घेतले नाही. स्थानिक डॉक्टरांनी तिला नांदेड येथील रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला होता. अखेर, ही महिला परभणीतील आर.पी हॉस्पिटलमध्ये दाखल झाली, जिथे तिच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले. आर.पी हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यावर सर्वप्रथम या महिलेच्या रक्त तपासण्या करण्यात आल्या. तपासण्यांमधून तिची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे स्पष्ट झाले. वेळ न दवडता, हॉस्पिटलच्या तज्ञ

डॉक्टरांच्या टीमने तत्काळ शस्त्रक्रियेचा (सिझेरियन सेक्शन) निर्णय घेतला. अनुभवी डॉक्टरांच्या नेतृत्वाखाली ही शस्त्रक्रिया अवघ्या ३० मिनिटांत यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली. शस्त्रक्रियेदरम्यान मृत गर्भ काढून टाकण्यात आला. मात्र, या प्रक्रियेत महिलेला अतिरिक्त रक्तस्रावाचा सामना करावा लागला. ज्यामुळे तिची गर्भपिशवी निळी पडली होती, असे डॉ. भीमराव कानकुटे यांनी सांगितले. शस्त्रक्रियेदरम्यान गर्भपिशवीतून सुमारे १ किलो वजनाच्या रक्ताच्या गाठी काढण्यात आल्या, तर महिलेच्या शरीरातून एक ते दीड लिटर रक्तस्राव झाल्याचेही डॉ. कनकुटे यांनी नमूद केले. या जटिल शस्त्रक्रियेत आर.पी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमीर तडवी व तज्ञ डॉक्टर आणि कर्मचारी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. डॉ.भीमराव कनकुटे व डॉ.फराह तडवी यांनी शस्त्रक्रियेचे नेतृत्व केले. तर भूलतज्ञ डॉ.श्रुती शहारे यांनी रुग्णाला स्थिर ठेवण्यात मोलाची कामगिरी बजावली. याशिवाय, डॉ. श्वेता, डॉ. प्रतिष्ठा, तसेच समुपदेशक स्वप्नील बोर्डे,ऑपरेशन थिएटर टेक्निशियन संध्या आळणे, किशोर नवले आणि पवन लोंढे यांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला. या सर्वांच्या समन्वयित प्रयत्नांमुळे ही शस्त्रक्रिया यशस्वी होऊ शकली. शस्त्रक्रियेनंतर महिलेची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने तिला तत्काळ आयसीयू (इंटेन्सिव्ह केअर युनिट) मध्ये दाखल करण्यात आले. या दरम्यान सदरील महिलेला हॉस्पिटल मधील शांताई ब्लड बँक मधून ५रक्ताच्या बॅग देण्यात आल्या . तसेच डॉक्टरांच्या चोवीस तास देखरेखीखाली उपचार सुरू ठेवण्यात आले. वाढलेला रक्तदाब आणि रक्तस्रावामुळे निर्माण झालेल्या गुंतागुंतीच्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. यामुळे महिलेची प्रकृती हळूहळू स्थिर झाली. हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे म्हणाले, ''आमच्या हॉस्पिटलची तात्काळ प्रतिसाद देण्याची क्षमता आणि आमच्या तज्ञ डॉक्टर आणि कर्मचारी यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे अशा गंभीर परिस्थितीत रुग्णांचा जीव वाचवणे शक्य होते. आम्ही नेहमीच रुग्णसेवेसाठी कटिबद्ध आहोत. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे आणि आम्ही भविष्यातही अशीच उच्च दर्जाची सेवा देत राहू.या सर्व डॉक्टरांच्या पथकाचे आ.पाटील यांनी कौतुक केले आहे.

श्री सहस्त्रार्जुन महाराज जयंती निमित्त देवी मंदिर जीर्णोद्धार व भव्य सभागृह भूमिपूजन सोहळा

(दशरथ शिंदे/दै.धर्मयोध्दा)

मानवत - श्री सो स क्षत्रिय समाज दक्षिण मुखी हनुमान मंदिर पंच मंडळ, मानवत येथे श्री. सहस्त्रार्जुन महाराज जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त मानवत नगरीचे विकास पुरुष माननीय डॉक्टर श्री अंकुश भाऊ लाड यांच्या पुढाकाराने रंगर गल्ली येथील देवी मंदिर जीर्णो द्धार आणि भव्य सभागृह बांधकामासाठी एक कोटी रुपयाचा आमदार राजेश दादा विटेकर यांच्यामार्फत निधी मंजूर करून घेतला असून माननीय आमदार राजेश दादा विटेकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. तत्पूर्वी मान्यवरांचे औक्षण करण्यात आले आणि समाजाच्या वतीने मान्यवरांचा भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉक्टर श्री अंकुश भाऊ लाड यांनी एक वर्षाचे आत सभागृहाचे बांधकाम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यानंतर प्रमुख पाहुणे मा. आमदार श्री. राजेशदादा विटेकर यांनी मानवतमध्ये विविध विकासात्मक योजना आणणार असून मानवत मध्ये भव्य असे क्रीडा संकुल उभारण्यात येणार असल्याचे जाहीर केले. तसेच उभा महादेव मंदिर विकासासाठी देखील योजना प्रस्तावित असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी समाज अध्यक्ष ॲड. नामदेव नाकोड यांनी मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री.सो.स.क्षत्रिय समाज, दक्षिणमुखी हनुमान मंदिर अध्यक्ष श्री. दिगंबरसा बाकळे हे होते. श्री. प्रकाशजी पोरवाल, श्री. मोहनभाऊ लाड, श्री. संजयजी बांगड यांची विशेष उपस्थिती तर अनेक कार्यकर्ते आणि फार मोठ्या प्रमाणात समाज बांधव तसेच नागरिक, महिला भगिनी उपस्थित होत्या. हा भव्य दिव्य असा सोहळा सर्व पंच कमिटीतील सदस्यांच्या सहकार्याने पार पडला कार्यक्रमानंतर सर्वांना अल्पोपाहाराचा आस्वाद देण्यात आला.

सेलू - तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) तर्फे श्री १०८ अमृतेश्वर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे सेलू येथे आगमनानिमित्त स्वागत करण्यात आले. या प्रसंगी तालुका अध्यक्ष श्री सुधाकर रोकडे, श्री प्रशांत नाईक सर, श्री बालप्रसाद राठोड आणि श्री प्रविण महाजन उपस्थित होते. (छाया-सुरज शहाणे)

धुणे धुताना मोठा अनर्थ दोन सख्ख्या बहिणी तळ्यात बुडाल्या; एकीचा मृत्यू, दुसरीची प्रकृती गंभीर

(सचिन रायपत्रीवार/ दै.धर्मयोध्दा)

जिंतुर - तालुक्यातील कुऱ्हाडी गाव शिवारात असलेल्या तलावांत धुणे धुताना दोन सख्ख्या बहिणी तळ्यात बुडाल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी ३० ऑक्टोबर दुपारी घडली. यात एकीचा मृत्यू झाला असून दुसरीची प्रकृती चिंताजनक आहे. सातपूर, नाशिक येथे वास्तव्यास असलेले परमेश्वर बारकिराम चव्हाण हे कुटुंबासह आपल्या नातेवाईकांच्या लग्नासाठी काही दिवसांपूर्वी मूळ गावी, कुऱ्हाडी येथे आले होते. लग्नसोहळा संपल्यानंतर गुरुवारी दुपारी त्यांच्या विवाहित मुली पूजा परमेश्वर चव्हाण (२०) आणि अविवाहित मुलगी संध्या परमेश्वर चव्हाण (१७) या दोघी धुणे धुण्यासाठी गावशेजारील तळ्यावर गेल्या. धुणे धुत असताना दोघींचा पाय घसरून त्या तळ्यात पडल्या. शेजारील महिलांनी आरडाओरड केली असता गावातील नागरिक धावून आले आणि दोघींना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू केला. काही वेळानंतर पूजा ही सापडली. तिला तातडीने ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, तिची प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचारासाठी परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. दरम्यान, संध्या ही तळ्यातील खोल खड्ड्यात अडकल्याने तिला शोधण्यासाठी अर्धा तासाचा अवधी लागला. अखेर ती सापडल्यावर तिला ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकारी डॉ पारवे यांनी तपासून तिला मृत घोषित केले. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. बातमी देईपर्यंत या प्रकरणी पोलिसांत नोंद झालेली नव्हती.

बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी आंदोलन: वाढता पाठिंबा, जरांगे पाटील यांची एन्ट्री, सरकारची कोंडी

(ज्ञानेश्वर देशमुख/दै.धर्मयोध्दा)

लातुर - नागपूर-वर्धा- हैद्राबाद या महामार्गावर बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी आंदोलन होत आहे. या आंदोलनास महाराष्ट्रभरातून वाढता पाठिंबा मिळत आहे. अनेक नेते, विविध संघटना ह्या आंदोलनास आपला पाठिंबा देत आंदोलनात सामील होत आहेत. मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील हे देखील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आंदोलनस्थळी उपस्थित झाले. आंदोलनामुळे तब्बल १५ तास महामार्ग ठप्प होता. बच्चू कडू यांच्या आठ मोठ्या मागण्या असून त्या पूर्ण करण्यासाठी सरकारकडून मोठ्या हालचाली सुरू आहेत. आज बच्चू कडू व सरकार मध्ये मुंबई येथे मागण्या बाबत चर्चा होणार आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीकडून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आश्वासन दिले होते.पण सरकार स्थापन झाल्यास कर्जमाफी कडे दुर्लक्ष केले. शेतकरी मात्र या वर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्यामुळे ओला दुष्काळाला सामोरे जात आहे. कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत असल्यामुळे बच्चू कडू एकीकडे शेतकरी कर्जमाफी साठी आंदोलन करत आहेत. तर या आंदोलनाने दुसरीकडे सामान्य जनतेची प्रचंड कोंडी केल्याचे चित्र आहे. कर्जमुक्ती,

शेतमालाला हमीभाव, दिव्यांगांना सहा हजार रुपयांचे मानधन, तसेच मेंढपाळ आणि मच्छीमारांच्या न्याय्य हक्कांसाठी प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी आंदोलन पुकारले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांना घेऊन बच्चू कडू हे चांगलेच आक्रमक झाले आहे. बच्चू कडूंच्या नेतृत्वात राज्यभरातील शेतकरी आणि प्रहार कार्यकर्त्यांनी नागपुरात चक्काजाम आंदोलन सुरू केलं आहे. दरम्यान या आंदोलनकर्त्यांनी नागपूर-वर्धा आणि जबलपूर-हैदराबाद महामार्गासह इतर चार महामार्ग रोखून धरले आहे. परिणामी काल १५ तासांहून अधिक काळ अनेक वाहने महामार्गावर अडकून पडले आहे.

बच्चू कडूंच्या आंदोलनानंतर राज्य सरकारकडूनही चर्चेसाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू अशी घोषणा देऊन सत्तेत आलेल्या सरकारने अद्याप शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही, सरकारने शेतकऱ्यांना कर्जमुक्ती करावी, अशी मागणी बच्चू कडू यांच्याकडून करण्यात आली आहे. तसेच अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असताना दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची घोषणा राज्य सरकारने केली होती. मात्र अद्यापही अनेक शेतकऱ्यांना योग्य मदत देण्यात आलेली नाही, त्यामुळे जाहीर केलेली मदत शेतकऱ्यांना तात्काळ मिळावी, अशी मागणी बच्चू कडू यांच्याकडून करण्यात आली आहे.

बच्चू कडूंच्या प्रमुख मागण्या काय काय?

शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज कोणत्याही अटी शर्ती शिवाय त्वरित माफ करावे. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांसह सर्व शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करावा. पिक कर्जा बरोबरच, मध्यम मुदत, पॉली हाउस, शेड नेट, जमीन सुधारणा, सिंचन सुविधांसह सर्व कर्जाचा कर्जमाफीत समावेश करा. ऊसाला सन २०२५-२६ या वर्षासाठी ९ टक्के रिकव्हरी साठी प्रति टन ४३००/- रुपये व वर प्रति एक टक्का रिकव्हरीसाठी ४३०/- रुपये एफ.आर.पी. द्यावी. आजवरची थकीत एफ.आर.पी. रक्कम शेतकऱ्यांना द्यावी.तसेच कांद्याला किमान प्रति किलो ४०/- रुपये भाव द्या. कांद्यावरील निर्यातबंदी, किमान निर्यात मूल्य व निर्यात कर कायमस्वरूपी बंद करा. भाव पाडण्यासाठी होत असलेला नापेड व एन.सी.सी.एफ.चा वापर बंद करून या संस्थांचा उपयोग शेतकऱ्यांना कांद्याला रास्त दाम मिळावे यासाठी करा. दुधाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव द्यावा. गायीच्या दुधाला किमान ५०/- रुपये बेस रेट व म्हशीच्या दुधाला ६५/- रुपये भाव द्या. दुध क्षेत्राला एफ. आर. पी. व रेव्होन्यू शेअरिंगचे धोरण लागू करा. दुध भेसळ रोखण्यासाठी ठोस धोरण घ्या.

बच्चू कडू यांच्या आठ मोठ्या मागण्या:

१) शेतकऱ्यांची सरसकट कर्ज माफी जाहीर करावी. २) कृषी मालाला हमी भावावर () २०% अनुदान देण्यात यावे. ३) शहराप्रमाणे ग्रामीण भागातील घरकुलाला समान निकष लाऊन ५ लाख रु. अनुदान द्यावे. ४) पेरणी ते कापणीचा सर्व खर्च मधुन करावा. ५) नागपुर - गोवा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा. ६) दिव्यांग, निराधार, विधवा भगिनी व अनाथांना मासिक ६ हजार रुपये मानधन मिळावे- ७) मेंढपाळ व मच्छीमार यांच्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करून त्यांचे प्रश्न मार्गी लावावे ८) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावावा.

बेस्ट प्रशासना विरोधात शिवसेनेचे आंदोलन, सुचना न देता नफ्यातील बस सेवा बंद

(दिनेश मराठे/ दै.धर्मयोध्दा)

मुंबई – बेस्ट मालकीच्या गाड्यांची संख्या कमी होत असल्याने प्रवाशांना तासनतास बसथांब्यावर बसची वाट पाहत रांगेत उभे रहावे लागत आहे. भांडुप येथेही बेस्ट प्रशासनाने कोणतीही सुचना न देता नफ्यात चालणारी बससेवा अचानक बंद केल्याने त्याचा मनस्ताप प्रवाशांना सहन करावा लागत आहे. बेस्टला खाजगीकरनाकडे नेण्याचा हा एक डाव असून त्या विरोधात भांडुप रेल्वे स्थानकाजवळ ठाकरे गटाच्या शिवसेनेच्यावतिने आंदोलन करण्यात आले. यावेळी माजी खासदार रमेश कोरगावकर, युवासेना कार्यकारणी सदस्य राजोल संजय पाटील यांच्या उपस्थितीत हे आंदोलन करण्यात आले.

भांडुप परिसरामध्ये असलेल्या बस मार्ग क्रमांक ६०५, ६०६, ६०८ व ६१२ यापैकी ६०८,

६१२ या मार्गावरची बस वाहतूक पूर्णता बंद करण्यात आली आहे. तर ६०५ व ६०६ या मार्गावरची बस वाहतूक १ नोव्हेंबर पासून बंद होण्याच्या मार्गावर आहे. तर ६०७ क्रमांकाची बस तुळशेत पाडा पर्यंत जात होती. तिला शिवाजी तलावापासून स्टेशन पर्यंत करुन ठेवली आहे. त्यामुळे ६०८, ६१२ व ६०७ बसने प्रवास करणा-या प्रवाशांचे हाल होत असून त्यांना जादा भाडे देऊन रिक्षाने प्रवास करावा लागत आहे. त्यातच रिक्षा चालकांची मनमानी वाढली असून नेहमी पेक्षा त्यांची दादागिरी वाढली आहे. याचा त्रास सर्वसामान्य नागरीकांना होत असून बेस्टचे खाजगीकरण करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने उचललेले हे एक पाऊल आहे. अदानी, अंबानी प्रमाणेच बेस्टला ही अशाच एका उद्योगपतीच्या दावनीला बांधण्याचे काम हे प्रशासन करीत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. बेस्ट प्रशासनाने बस बंद केल्याने त्याच्या विरोधात भांडुप पश्चिमेला रेल्वे स्थानकाजवळ शिवसेनेच्यावतिने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात असंख्य शिवसैनिक तसेच शिवसेनेचे माजी आमदार व विभाग प्रमुख रमेश कोरगावकर, युवासेना कार्यकारणी सदस्य राजोल संजय पाटील उपस्थित होते. त्यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.